समारोप सोहळ्यात भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे सादरीकरण

राष्ट्रकुल 'बॅटन' आता अहमदाबादकडे

पीटीआय, ग्लासगो

वाढत्या आर्थिक खर्चाचे समीकरण सोडवत संक्षिप्त स्वरूपात पार पडलेल्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची सांगता होताच, भारताने सर्व राष्ट्रकुल देशांना शतकमहोत्सवी स्पर्धेसाठी भारतात अहमदाबाद येथे येण्याचे निमंत्रण दिले. प्राचीन तत्त्वज्ञान, आधुनिक कला आणि सांस्कृतिक भव्यतेचा मेळ घालत भारताने एका सादरीकरणाद्वारे २०३० मधील या स्पर्धेच्या शताब्दी आवृत्तीच्या प्रवासाची अधिकृत सुरुवात केली.

ओव्हिअ हावड्डा मैदानावर पार पडलेल्या एका भावुक सांगता सोहळ्यात राष्ट्रकुल स्पर्धेचा मानाचा दंड (बॅटन) अधिकृतपणे भारताकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी संगीत, नृत्य आणि कथाकथनाच्या माध्यमातून भारताची परंपरा आणि आधुनिकता एकत्र नांदणारी ओळख जगासमोर मांडण्यात आली.

किंग चार्ल्स तिसरे यांचे प्रतिनिधित्व करणारे एडिनबर्गचे ड्युक, प्रिन्स एडवर्ड यांनी खेळ अधिकृतपणे समाप्त झाल्याची घोषणा केली. ते म्हणाले, ''तुम्ही त्या पद्धतीने या स्पर्धा खेळल्या, त्यांचे आयोजन केले आणि सहकार्य केले, त्याबद्दल धन्यवाद. तुम्ही पुन्हा एकदा राष्ट्रकुलची मूल्ये आणि भावना जागृत केल्या आहेत. धन्यवाद ग्लासगो!'' मी सर्व देशांतील खेळाडूंना पुढील चार वर्षांनी भारतातील अहमदाबाद येथे २७व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी आमंत्रित करतो, जी या स्पर्धांची शताब्दी आवृत्ती असेल, असेही प्रिन्स एडवर्ड म्हणाले.

सांस्कृतिक उत्सव

या गेमीर क्षणानंतर मैदानातील वातावरण भारताच्या सांस्कृतिक उत्सवात बदलले. भारताचे सादरीकरण तीन भागांत विभागले होते. आयोजकांच्या मते, हा प्रवास सामायिक मूल्ये, संस्कृती आणि नाते साजरे करणारा होता. याचा मुख्य संदेश 'वसुधैव कुटुम्बकम्' (संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे) या प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित होता, जो राष्ट्रकुलच्या एकता आणि मैत्रीच्या मूल्यांशी सुसंगत आहे.

पहिल्या भागात भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्षाचे औचित्य साधत अभिनेत्री मानुषी छिल्लर हिच्या नेतृत्वाखाली एक भव्य नृत्य सादर करण्यात आले. डिजिटल व्हिज्युअल्सच्या पार्श्वभूमीवर शेकडो नर्तकांनी भारताच्या विविधतेचे दर्शन घडवले, तर संगीतकार शंकर महादेवन यांच्या संगीताने त्यात भव्यता आणली. या सादरीकरणातून भारताची भाषा, चालीरीती आणि कला या विविधतेच्या माध्यमातून जगाचे स्वागत करणारी संस्कृती दाखवण्यात आली.

अहमदाबादची ओळख

आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी अहमदाबादची ओळख करून देणारा एक विशेष लघुपट या वेळी दाखवण्यात आला. या लघुपटात खेळ हा भारतीय जीवनाचा अविभाज्य भाग कसा आहे, हे प्राचीन काळापासून ते आजच्या तरुण भारताच्या आकांक्षांपर्यंत दाखवण्यात आले. गुजरात हे शतकानुशतके जुना वारसा आणि आधुनिक शहरी महत्त्वाकांक्षा यांचा संगम असलेले ठिकाण म्हणून दाखवण्यात आले, ज्यामुळे अहमदाबाद हे या शताब्दी आवृत्तीसाठी योग्य ठिकाण असल्याचे अधोरेखित झाले. खेळाच्या लोकांना एकत्र आणण्याची आणि विविधता साजरी करण्याची ताकद आहे, हा संदेश या लघुपटाच्या शेवटी देण्यात आला.

नीरजने स्वीकारला ध्वज

- महिलांच्या ५७ किलो वजनी गटात बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या जॅस्मिन लम्बोरियाने सांगता समारंभात भारताचा ध्वज धरला होता. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा ध्वज मैदानाभोवती फिरवून अधिकृत हस्तांतरणाची सुरुवात झाली. स्कॉटलंड आणि भारताचा ध्वज घेतलेल्या धारकांच्या नेतृत्वाखाली हा ध्वज खाली उतरवण्यात आला.
- ग्लासगोच्या लॉर्ड प्रोव्होस्ट जॅकलिन मॅकलारेन यांनी हा ध्वज राष्ट्रकुल गेम्स स्कॉटलंडच्या उपाध्यक्ष सुसान जॅक्सन, स्कॉटिश नेटबॉल खेळाडू एमिली निकोल, राष्ट्रकुल क्रीडाचे अध्यक्ष डॉ. डोनाल्ड रुकडे यांच्याकडे सोपविला. त्यानंतर त्यांनी दोन वेळचा ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्राकडे ध्वज आणि बॅटन सुपूर्द केला.
- मग नीरजने ध्वज भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षा पी.टी. उषा यांच्याकडे दिल्यावर उषा यांनी तो गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्याकडे सुपूर्द केला. याद्वारे यजमानपदाची जबाबदारी अधिकृतपणे स्कॉटलंडकडून भारताकडे आली.

महादेवन कुटुंबाचे सुश्राव्य गायन

अखेरचा भाग भारताच्या प्रसिद्ध महादेवन कुटुंबाचा होता. शंकर महादेवन यांनी त्यांचे मुलगे सिद्धार्थ आणि शिवम महादेवन यांच्यासोबत व्यासपीठावर येऊन भारताची कला ही प्रसिद्ध गाणी सादर केली. यामध्ये 'सुनो गौर से दुनिया वालो', 'भाग मिल्खा', 'ऐ वतन वतन' आणि 'लहरा दो' या गाण्यांचा समावेश होता. गुजराती पार्श्वगायिका भूमी त्रिवेदी हिने गुजरात राज्याला विशेष मानवंदना दिली. भारताच्या या सादरीकरणापूर्वी ग्लासगोने स्कॉटिश संगीत, कविता आणि नृत्याद्वारे निरोप घेतला. स्कॉटलंडची व्हीलचेअर धावपटू मेलानी वूड्स हिने 'डेव्हिड डिक्सन पुरस्कार' जिंकला. हा पुरस्कार राष्ट्रकुल स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूला त्याच्या कामगिरीसाठी आणि खिलाडूवृत्तीसाठी दिला जातो.



सांस्कृतिक जुगलबंदी

दुसऱ्या भागात दोन्ही देशांमधील संगीताचा सांस्कृतिक पूल दाखवण्यात आला. या भागाला 'सांस्कृतिक जुगलबंदी' असे नाव देण्यात आले होते. यात आंतरराष्ट्रीय स्याताीचे भारतीय सतारवादक ऋषभ शर्मा आणि स्कॉटलंडचे प्रसिद्ध संगीतकार रॉस एन्सली एकत्र आले. शर्मा यांची सतार आणि एन्सली यांच्या स्कॉटिश पाइप्समधील संवाद म्हणजे दोन प्राचीन संगीत परंपरांमधील संवाद होता. भौगोलिक सीमा ओलांडून संगीत कसे एकत्र आणू शकते, याचे हे उत्तम उदाहरण होते.

अहमदाबाद येथे २०३० मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा सुलभता आणि शाश्वततेच्या बाबतीत नवे मापदंड प्रस्थापित करतील. तसेच, या बहु-क्रीडा स्पर्धेच्या शताब्दी आवृत्तीचे आयोजन करण्यासाठी अहमदाबाद शहराकडे आधीपासूनच पुरेशी पायाभूत सुविधा उपलब्ध आहे. पैरा-खेळाडूंसाठी या स्पर्धा अत्यंत अनुकूल ठरतील याद शंका नाही. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आम्ही खाजगी क्षेत्राबरोबरही हातमिळवणी करू, परंतु केंद्र सरकार आणि गुजरात सरकारने या खेळांसाठी पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आहे. – **हर्ष संघवी**, गुजरातचे उपमुख्यमंत्री आणि क्रीडामंत्री

'सीओई'च्या कार्यक्षमतेवरच शंका

श्रीलंकेविरुद्ध बुमराच्या अनुपलब्धतेनंतर चर्चेला उधाण

पीटीआय, नवी दिल्ली

श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी जसप्रीत बुमरा उपलब्ध नसल्याने समोर आल्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) मधील क्रीडा विज्ञान चमू आणि राष्ट्रीय निवड समिती यांच्यात असलेल्या संवादाचा अभाव समोर आला आहे.

राष्ट्रीय निवड समितीला श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेसाठी संघ निवडताना सुरुवातीला बुमरा उपलब्ध असेल असे सांगण्यात आले होते. परंतु, नंतर त्यांची दुखापत अपेक्षेपेक्षा जास्त गंभीर असल्याचे समोर आले. त्यामुळे संघ निवड झाल्यावर निवड समितीला यात नव्याने बदलाचा शोध घ्यावा लागला. तसेच, खेळाडूंच्या वाढत्या दुखापतींमुळे 'सीओई'च्या पुनर्वसन कार्यप्रणाली आणि संघाचे फिजिओ कमलेश जैन यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

क्रीडा क्षेत्रात दुखापती होणे ही सामान्य बाब असली, तरी सर्व आधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या अत्याधुनिक 'सीओई'मधील क्रीडा विज्ञान चमूची कामगिरी फारशी समाधानकारक राहिलेली नाही. नितीन पटेल यांच्यानंतर 'बीसीसीआय'मध्ये क्रीडा विज्ञानाचा कोणीही अधिकृत प्रमुख नाही आणि या विभागाच्या अलीकडच्या कामकाजावरून त्यांनी या सर्वांच्या पदाची पोकळी भरून काढण्यासाठी काहीही विशेष केले नसल्याचेही मानले जात आहे.

भारतीय संघासह पाच वर्षे असलेले फिजिओ कमलेश जैन यांच्या कार्यक्षमतेवर देखील शंका घेतली जात आहे. खेळाडूंमध्ये ते खूप लोकप्रिय असले, तरी इंग्लंडमधील दुखापतीच्या प्रकरणानंतर त्यांच्यावर टीका होत आहे. त्यांच्या उपस्थितीत खेळाडूंना दुखापती होत असल्याचे निरीक्षण काही माजी खेळाडूंनी नोंदवले आहे. त्यामुळे त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याची वेळ आली आहे.

शंका उपस्थित करणारे मुद्दे

- हर्षित राणाचे वजन अधिक असल्याचे माहित असतानाही त्याला तंदुरुस्त कसे घोषित केले
- वॉशिंग्टन सुंदरसाठी स्नायूदुखी ही डोकेदुखी ठरत आहे. 'सीओई'ने त्याच्या या दुखापतीची दखल घेतली आहे का?
- नितीश कुमार रेड्डीला वेग वाढवण्यास परवानगी कुणाची, या अचानक वेग वाढीमुळे त्याची स्नायूदुखी बळावली.
- क्रीडा विज्ञान कर्मचारी अव्वल खेळाडूंना वेळेवर मैदानात उतरवण्यासाठी पुरेसे प्रयत्न करत आहेत का?
- साई सुदर्शनचा समावेश तंदुरुस्तीवर अवलंबून असून, तो तरी पहिल्या कसोटीसाठी उपलब्ध होईल का?

पराभव आणि संघात लागोपाठ होत असलेल्या दुखापतींमुळे ही शंका घेतली जाऊ लागली आहे.

'बीसीसीआय'च्या पुरावलोकन बैठकीवर जैन यांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. मात्र, ही बैठक अद्याप झालेलीच नाही. बैठकीसाठी प्रशिक्षक गौतम गंभीर यांची उपस्थिती आवश्यक आहे. मात्र, आता ते श्रीलंकेत असणार असल्याने ही बैठक कधी होणार हे स्पष्ट झालेले नाही. गंभीर आणि आगरकर जुलै महिन्यात भारतात असताना ही बैठक का घेण्यात आली नाही, असाही प्रश्न आता उपस्थित होत आहे.

बुमराच्या जागी नबीला संधी

जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीला जायबंदी जसप्रीत बुमराच्या जागी सोमवारी श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघात स्थान देण्यात आले. त्यामुळे भारताच्या कसोटी संघात स्थान मिळवणारा तो जम्मू-काश्मीरचा पहिला खेळाडू ठरला. बुमराच्या तंदुरुस्तीच्या आधारे कसोटी संघात स्थान देण्यात आले होते. मात्र, इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेदरम्यान झालेल्या गुडघ्याच्या दुखापतीतून तो सावरु शकला नाही. त्यामुळे त्याला श्रीलंका दौऱ्याबाहेर जावे लागले. नबीला प्रदमच वरिष्ठ राष्ट्रीय संघात सहभागी करण्यात आले आहे.

स्वानंद, केदार, सुहास, मनीष विजेते

पुणे : महाराष्ट्र मास्टर्स राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत स्वानंद बेडेकर, केदार अहिरवाडकर, सुहास राणे, मनीष रावत यांनी विजेतेपद मिळविले. डेक्कन जिमखाना क्लब व शारदा टेबल टेनिस हॉलमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत ४० वर्षावरील पुरुष गटात अंतिम लढतीत बाराव्या मानांकित पुण्याच्या स्वानंद बेडेकर यांनी मुंबई शहराच्या सहाव्या मानांकित गौरव पाटेंचा ११-९, ११-७, ७-११, ११-३ असा पराभव केला. स्पर्धेतील ४५ वर्षांवरील पुरुष गटात पुण्याच्या केदार अहिरवाडकर यांनी मुंबई शहराच्या अव्वल मानांकित केदार कसबेकरचा ११-५, २-११, ११-६, ११-९ असा पराभव केला. मुंबईच्या सुहास राणे यांनी ५० वर्षावरील पुरुष गटात चौथ्या मानांकित पुण्याच्या नचिकेत देशपांडेचा १३-११, ८-११, १३-१५, ११-४, १२-१० आणि ५५ वर्षावरील पुरुष सोलापूरच्या मनीष रावत यांनी दुसऱ्या मानांकित नागपूरच्या बसव चौधरीचा ११-६, ११-५, ९-११, १२-१० असा पराभव केला.

जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा आजपासून

पुणे : आतापर्यंत प्लेअर्स चषक नावाने आयोजित होणाऱ्या मानांकन टेबल टेनिस स्पर्धेला या वर्षापासून जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेचा दर्जा मिळाला असून, ही स्पर्धा आज, मंगळवारपासून शारदा क्रीडा संकुलात सुरू होणार आहे. बालुक आंटोमेशन हे या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक असून, माजी टेबल टेनिसपटूंचे या वेळीही सहकार्य लाभले आहे. या स्पर्धेला जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेचा दर्जा मिळाल्यामुळे जिल्ह्यातील बहुतेक नामांकित खेळाडू स्पर्धेत सहभागी झाल्याची माहिती संयोजन सचिव आप्तेल्पा बोडस यांनी दिली.

जाहीर निविदा

साईकृष्ण पार्क सहकारी गृहनिर्माण संघ मर्यादित, (सी.क्र.: पीएमए/पीएमसी (३)/एचएसडी / (ओएच)/५१२३/सन २०२२, दिनांक २६.०५.२०२२) पत्ता: सर्वे क्र. १९/१/१५, ढोले पाँक, वेलांड, पुणे ४१५०३३ या संस्थेच्या पात्र सभासद/ हस्तांतरा प्रस्तावित पुनर्विकासाकरिता सीमांकित विकसकांकडून सौजन्य निविदा मागविण्यात येत आहेत. किंमत पत्ताला रक्कम रु.२०,०००/- (रु. वीस हजार फक्त) डिमांड ड्राफ्ट स्वरुपामध्ये रक्कम भरलास निविदा कागदपत्रे 'क्रिएटिव्ह व्हेंचर्स, ६, शारदा प्लिन्थ, स.नं. १०८/१४/२, अंधेरी पाषाण रोड, अभिमानश्री फेडरेशन सेंट नं.५ कॉर्नर, पुणे ४११००८' येथे कार्यालयात उपलब्ध होतील. डिमांड ड्राफ्ट हा 'साईकृष्ण पार्क सहकारी गृहनिर्माण संघ मर्यादित' या नावे घ्ये येथे सादर. निविदा कागदपत्रे क्रिएटिव्ह व्हेंचर्स यांचे कार्यालयात दि.०६/०८/२०२६ ते दि. १४/०८/२०२६ या कालावधीमध्ये दुपारी ३.०० ते सायं ६.०० दरम्यान उपलब्ध असतील. निविदेच्या दस्तऐवजाचा भाग अ-डीडीएच संस्थेस बयाणा ठेवी भरणासाठी सौजन्य निरुपयोगात ठेवणे आवश्यक आहे. निविदेचा भाग ब दुसऱ्या लिफाफ्यात ठेवणे आवश्यक आहे. दोन्ही लिफाफे 'अ/ब, साईकृष्ण पार्क सहकारी गृहनिर्माण संघ मर्यादित' यांचे नावे मोठ्या लिफाफ्या लिफाफ्यात ठेवणे आवश्यक आहे. सौजन्य लिफाफे क्रिएटिव्ह व्हेंचर्स कार्यालयात दि. २२/०८/२०२६ रोजी सायं. ०६.०० वाजता किंवा त्यापूर्वी सादर करावेत. निविदा दस्तऐवज निविदा कागदपत्रांच्या भाग अ मध्ये दर्शविल्या वेळापत्रकानुसार उपस्थित व्यक्ति/अर्जदारांच्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच प्राप्त झालेल्या निविदा मंजूर करण्याचे अथवा कोणत्याही कारणास्तव नाकारण्याचे सर्व अधिकार संस्थेने राखून ठेवलेले आहेत.

सही/-अध्यक्ष / सचिव
(साईकृष्ण पार्क सहकारी गृहनिर्माण संघ मर्यादित)
दिनांक

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, पत्ता - सीटीआर. ११९/बी, प्रमिला अपार्टमेंट, तिसरा मजला, मंडिल कॉलनी, शिवाजीनगर,, पुणे १६

जाहीर समन्स

वादी – अर्बनिस्ट्री नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे, पत्ता स.नं. ६८६/२ अ, गंगोडी हॉलिंग सोसायटी, फर्ल्ट नं. १, विश्रांतवाडी, पुणे ३१ यांनी मा. सहा. निबंधक, सह.संस्था (परसेवा), महाराष्ट्र राज्य सह. पत. फेडरेशन मर्या. नि. पुणे या कार्यालयाकडे संस्थेच्या थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी दावा दाखल केलेले आहेत. या सर्व थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांना त्यांचे म्हणणे मांडलेसाठी सोबी देऊन **दि. २८/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मा. सहा. निबंधक, सह. संस्था (परसेवा) पुणे शहर द्वारा सीटीसी क्र. ९११/बी, प्रमिला अपार्टमेंट, तिसरा मजला, लकाकी रोड, शिवाजीनगर, पुणे ४११०१६** या कार्यालयात सुनावणीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु खालील जाहदार यांना वेळोवेळी सुनावणी नोटीस दिलेल्या पत्तावर आर.पी.ए. डी. द्वारे पाठविणेत आलेली आहे. परंतु प्रतिवादी यांना सुनावणी नोटीस रुजू न झालयाने / त्यांचे नवीन पत्ते उपलब्ध नसल्याने त्यांना शेवटची संधी देऊन त्यांचे म्हणणे मांडणेसाठी **मा. सहा. निबंधक, सह.संस्था (परसेवा) पुणे शहर द्वारा सीटीसी क्र. ९११/बी, प्रमिला अपार्टमेंट, तिसरा मजला, लकाकी रोड, शिवाजीनगर, पुणे ४११०१६,** या कार्यालयात **दि. १४/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.** सुनावणीसाठी बोलविण्यात येत आहे. ते याही वेळी सुनावणीस रिहाकर राहिलयास त्यांचे सदरील दाव्याबाबत काही एक म्हणणे नाही असे इहीत धरुन त्यांचे विरुध्द वसुली प्रमाणपत्र बाबाचा दावा निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रतिवादी –

क्र.	कर्जदार/जामीनदार	पत्ता	दा.क्र.	एकूण रक्कम
१	कर्जदार : भोसले राजू धोंडीराम जामीनदार : भोसले दिनेश राजू	स.नं. १/४, न्यू लक्ष्मीनगर, पिंपळे गुरव, पुणे स.नं. १/४, न्यू लक्ष्मीनगर, पिंपळे गुरव, पुणे	६३५	१,८२,५९९/-
२	कर्जदार : भोसले नितेश राजू / भोसले अक्षता निलेश	स.नं. १/४, न्यू लक्ष्मीनगर, पिंपळे गुरव, पुणे	६३६	१,४९,९२५/-

स्वाक्षरीत
(ज्योती दादासाहेब शिंदे)
मा.सहा.निबंधक सह.संस्था (परसेवा)
महाराष्ट्र राज्य सह.पत.फेडरेशन मर्या.,

IDBI BANK
आयडीबीआय बँक लि., टिटेल रिकव्हरी, आयडीबीआय हाऊस, पहिला मजला, ज्ञानेश्वर पादुका चौक, एफ.सी. रोड, शिवाजी नगर. पुणे-४११००४.
विक्रि सूचना

स्थावर मालमत्तेच्या विक्रिकरिता जाहीर सूचना
परिशिष्ट IV-A (नियम ८(६)/९(१)* ची तरतूद पहा)

सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम ८(६)/९(१)* च्या तरतुदीखा वाचलेल्या वित्तिय मत्तेची सुरक्षितता व पुर्तरुपना आणि सुरक्षा कायदा, 2002 ची अंमलबजावणी अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्रि सूचना. आम जनतेस आणि विशेषकरून ऋणकर्ता व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, येथे खाली वर्णितेली केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनको यांच्याकडे तारण / थाकवत असून, या मालमत्तेचा प्रत्यक्ष तावा आयडीबीआय बँक लि., सुरक्षित धनको च्या ताब्याकडे थकबाकीच्या पोत्यात आत आहे. सदर मालमत्तेची विक्रि, खाली नमूद केलेले कर्जदार यांच्याकडून आयडीबीआय बँक लिमिटेड, सुरक्षित धनको यांना देय असलेल्या वसुलीसाठी "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे", "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" तत्वाना **दि. 21-08-2026** रोजी विक्री करण्यात येणार आहे. आरक्षित किमत आणि बयाणा रक्कम देय खालीलप्रमाणे आयाणा आहे :

स्थावर मालमत्तेचे वर्णन

कर्जदार यांचे नाव आणि आणि मालमत्तेचे मालक	खाते क्र. आणि दि. 10.06.2026 रोजी मुसार थकीत कर्ज रक्कम	मागणी सूचना / तारा दिनांक	आरक्षित किमत आणि बयाणा रक्कम (रु. मध्ये)	पाहणीची दिनांक	मालमत्तेचे वर्णन
श्री. अभयसिंह नारायणराव शिंदे आणि श्री. सजनराव श्रीमंत पाटील	025067510000630 / 067767510000517 थकबाकी रु. 1,57,45,015.28 अधिक 10.07.2026 पासून लागू न केलेले व्याज	11.01.2019 10.03.2026	रु. 86,00,000/- आणि रु. 8,60,000/-	17.08.2026 (वेळ : सकाळी 11.00 ते दुपारी 2.00)	फर्लट क्र. - 702, सातवा मजला, विंग 'डी', 'स्कॅन ड्रायव्ही', स. क्र. 220, हिस्सा क्र. 1 आणि 5/5, हिनवडी, तालुका - मुळशी, जिल्हा पुणे - महाराष्ट्र मोजमाप 89.50 चौ. मी. सोबत संलग्न लाख पार्कवॅलीन रिया क्षेत्रफळ सुमारे 42.33 चौ. मी. सोबत वरचे टेरेस क्षेत्रफळ सुमारे 44.33 चौ. मी.
श्री. विशाल एकनाथ नागोकर आणि श्री. एकनाथ अण्णा नागोकर	060367510000309४ थकबाकी रु. 16,58,150.67 अधिक 10.07.2026 पासून लागू न केलेले व्याज	18-05-2024 28-10-2025	रु. 17,50,000/- आणि रु. 1,75,000/-	18.08.2026 (वेळ : सकाळी 11.00 ते दुपारी 2.00)	फर्लट क्र - 302, तिसरा मजला, सी विंग, मल्हार किल्ला, गट क्र - 164/1, सीटीएस क्र -1544, जेजुरी, तालुका - पुरंदर, पुणे - 412303 महाराष्ट्र. मोजमाप 432.30 चौ. फू. म्हणजे 40.17 चौ. मी. कार्पेट क्षेत्रफळ 593 चौ. फू. म्हणजे 55.11 चौ. मी. बिल्टअप क्षेत्रफळ अधिक संलग्न टेरेस मोजमाप 62 चौ. फू. म्हणजे 5.76 चौ. मी.

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तीसाठी, कृपया www.bankeauctionwizard.com आणि आयडीबीआय बँकेची वेबसाइट www.idbi.bank.in वर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या. कोणत्याही स्पष्टीकरणासाठी आणि ई-लिलाव सहायासाठी, इच्छुक पक्ष प्राधिकृत अधिकारी 020-66004122, आयडीबीआय बँक लि. टिटेल रिकव्हरी, आयडीबीआय हाऊस, पहिला मजला, ज्ञानेश्वर पादुका चौक, एफ.सी. रोड, शिवाजी नगर, पुणे-411004, श्री. रवी शंकर राव (टे.) 8878786488 किंवा श्री. अनन्यर्थ पॉल 7207526931 यांच्याशी संपर्क साधू शकतात. थोली दस्तऐवज, त्यामध्ये विक्रीच्या बविवरण अटी व शर्ती, बोली अर्ज इत्यादींचा समावेश आहे आणि कोणताही तपशा कार्यालयाच्या वेळा दिवसातून किमु तीन वेळेस विक्रि केंद्रावर उपलब्ध आहेत. तपशीलवार माहिती www.idbi.bank.in आणि www.bankeauctionwizard.com या संकेतस्थळांवरून डाऊनलोड करता येईल.

दिनांक : 04.08.2026
ठिकाण : पुणे
मराठी भाषांतरामध्ये काही संदिग्धता आढळल्यास इंग्रजी जाहिरात ग्राह्य धरण्यात यावी.
स्वा./-
प्राधिकृत अधिकारी

अभ्युदय को-ऑप. बँक लि.
(मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक)
पुणे क्षेत्रीय कार्यालय : १ ला मजला, धनवंत प्लाझा, ५९८, बुधवार पेठ, पुणे-४११००२.
फोन : ८९९९४८७९२/८९६९४५२७९३/९९, २९४२२२०२२०, ०२०-२४४३४५९८, २४४९१०९८
ई-मेल : recovery@abhyudaya.bank.in, support.banknet@psballiance.com, dgmpune@abhyudaya.bank.in
सरफेसी ॲक्ट २००२ अंतर्गत ई-ऑक्शन विक्री नोटीस

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनेंशियल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ मधील रुल ८(६) च्या अटींनुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-ऑक्शन विक्री सूचना.

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि विशेषकरून कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मालमत्ता, त्या अभ्युदय को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (सुरक्षित धनको) यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत आहेत आणि अभ्युदय को-ऑप. बँक लि. चे अधिकृत अधिकारी यांनी सदर सुरक्षित मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला असून, सदर मालमत्तेची विक्री खाली नमूद केलेल्या तपशीलानुसार **''जसे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''तेथे जे आहे'' आणि कोणत्याही फेरविचाराविना** या तत्त्वावर **दि. २८/०८/२०२६ रोजी स. ११.०० ते दु. ४.००** दरम्यान बँकेचे थोली वसुलीसाठी करण्यात येणार आहे.

मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ	बयाणा रक्कम जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ	ई-लिलावाची तारीख व वेळ
१४ ऑगस्ट २०२६ रोजी स. १.०० ते सायं. ५.००	२८ ऑगस्ट २०२६ रोजी दु. २.०० वाजेपर्यंत	२८ ऑगस्ट २०२६ रोजी स. ११.०० ते दु. ४.००

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	येणे रक्कम	मालमत्तेचे वर्णन आणि क्षेत्र	राखीव किंमत रूपये	बयाणा रक्कम रूपये	बोली वाढ रक्कम रु.	लिलावाची तारीख व वेळ
१	मे. ओम साई एंटरप्राइजेस, प्रोप्रा. श्री. संतोष लिंबराज जोगदंड	रू. ९१८.५९ लाख + त्यावरील दि. ०१/०८/२०२६ पासूनचे व्याज	स्वप्नशिल्प निवास बिल्डींग, स. नं. ७४/२/१, मंजिरीबाई स्कूलमागे, मातोश्री कॉलनी, ममता स्वीट मार्टनवळ, दिघी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे, क्षेत्रफळ १००० चौ. फूट (बिल्डींग ३३४-५७ चौ. मी.) श्री. लिंबराज मारुती जोगदंड यांच्या मालकीची.	रू. ७७,५३,०००/-	रू. ७,७५,३००/-	रू. २०,०००/-	दि. २८/०८/२०२६ स. ११.०० ते. दु. ४.००

सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ रूल मधील नियम ८(६) आणि ९(१) नुसार वैधानिक सूचना

ही सूचना कर्जदार, गहाणदार आणि उक्त कर्जाच्या जामीनदारांना विक्रीच्या तारखेपर्यंत किंवा त्यापूर्वी थकित रक्कम भरण्यासाठी १५ दिवसांची सूचना मानली जाईल, अन्यथा सुरक्षित मालमत्ता वरील लिलावाच्या तारखेला विकली जाईल. वरील नमूद केलेल्या मालमत्ता **दि. २८/०८/२०२६ रोजी स. ११.०० ते दु. ४.०० पर्यंत https://bankeauctions.com** या वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई-लिलावाद्वारे विकल्या जातील. बयाणा रक्कम जमा करण्याची अंतिम तारीख **दि. २८/०८/२०२६ रोजी दु. ०२.०० पर्यंत** आहे. विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती असलेली विक्री सूचना **https://bankeat.com** आणि आमच्या बँकेच्या वेबसाइट **https://www.abhyudaya.bank.in/english/Tender.aspx** वर उपलब्ध आहे. इच्छुक खरेदीदार **दि. १४/०८/२०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.००** या वेळेत विक्रीसाठी असलेली मालमत्ता पाहू शकतात. बँकेने विक्रीसाठी कोणताही एजंट/दलाल नियुक्त केलेला नाही. काही चौकशी असल्यास आणि/किंवा विक्रीच्या अटी व शर्ती खालील स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडून मिळवता येतील. कोणत्याही कारणाशिवाय प्राप्त झालेल्या कोणत्याही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

दिनांक : ०४/०८/२०२६ स्थळ : पुणे
ज्योती जे. दुराके
अधिकृत अधिकारी, अभ्युदय को-ऑप. बँक लि.

OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.
ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: क्र. ९, एम. पी. नगर, फर्स्ट स्ट्रीट, कॉन्ट्रा नगर एक्सटेंशन, तिरुपूर ६४१६०७. CIN: U67100TZ2014PTC020363
कॉर्पोरेट कार्यालय: कॉलिंग्ज सेंटर, ४७व मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई- ४०० ०२८.
संपर्क क्र. - ०२२-६९३ १११/९७३४०६१७५. ईमेल : mumbai@omkaraarc.com | वे. : +९१ ९७६९१७०७१४

[परिशिष्ट- IV-A] [९(१) सह वाचलेल्या नियम ८(६) ची तरतूद पाहा] अचल मालमत्तेच्या विक्रीकरीता ई-लिलाव जाहीर सुचना

**सुरक्षा हीत (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम ८(६) आणि नियम ९(१) च्या तरतुदीसह वाचलेल्या वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुर्तरुपना आणि सुरक्षा हीत कायदा, 2002 ("सरफेसी काय